डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
संचलित

# संतपीठ

श्री क्षेत्र पैठण

## माहिती पुस्तिका-२०२६



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,संचलित संतपीठ, श्रीक्षेत्र पैठण

## प्रवेश सूचना

संतपीठ, श्रीक्षेत्र पैठण येथे भारतीय परंपरा व संस्कृती, संत संप्रदाय, संत साहित्य, किर्तन, प्रवचन, तत्वज्ञान इत्यादी विषयाशी संबंधित परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रम हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या शैक्षणिक व्यवस्थापनात सुरु आहेत. संत साहित्याशी निगडीत विविध परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची **दहावी बॅच** दिनांक २२/०९/२०२६ पासून सुरु होणार असुन त्यासाठीची प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.

- **श्री तुकाराम गाथा ग्रंथ परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रम**
- **श्री एकनाथी भागवत ग्रंथ परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रम**
- **श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रम**
- **वारकरी संप्रदाय परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रम**
- **महानुभाव संप्रदाय परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रम**
- **श्री नामदेव गाथा ग्रंथ परिचय प्रमाणपत्र**
- **संत तत्त्वज्ञान परिचय प्रमाणपत्र**
- **सांप्रदायीक संगीत परिचय प्रमाणपत्र**

या अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रीयेची सविस्तर माहिती ही विद्यापीठाच्या www.bamu.ac.in या संकेतस्थळावर दिनांक २२/०९/२०२६ रोजी प्रकाशित करण्यात येणार आहे. प्रवेशास इच्छुक विद्यार्थ्यांनी या विषयीची अधिक माहिती ही संकेत स्थळावरुन जाणून घ्यावी.

**संदर्भक्र.**/संतपीठ/२०२६/२२
दिनांक :२१/०९/२०२६
संतपीठ परिसर, श्रीक्षेत्र पैठण
ता. जि. छत्रपती संभाजीनगर.

स्वा/-
कुलसचिव

# १. संतपीठाची भूमिका

संतांच्या महान परंपरेकरिता महाराष्ट्र ओळखला जातो. शिक्षण क्षेत्रातील मानवविद्याशाखा व त्याच्याशी निगडीत इतर शाखांच्या वाढीकरिता संतपीठाची भूमिका आदर्श व महत्वपुर्ण आहे. संतांनी सभ्यता, पावित्र्य, मानवता, समता आणि विवेकाने समाजाला जीवन जगण्याचा सरळ मार्ग मौखिक व लिखित साहित्यातून दाखविला आहे.

महाराष्ट्रात वारकरी, महानुभाव, दत्त, समर्थ यांसारखे विविध पंथ आहेत. या पंथांकडून जात, धर्म, लिंग यांच्यापलीकडे जाऊन साहित्य निर्मिती केली गेली. यामध्ये जात-धर्माचा अडथळा नसल्यामुळे सामाजिक जीवनात संतांनी समतोल साधला. याचा उपयोग समाजात परस्परांविषयी बंधुभाव, प्रेम निर्माण करुन समाजात समानतेची भावना सजविली.

ज्ञानेश्वरी, संत नामदेवांचे अभंग, संत एकनाथांचे वाङ्मय, संत तुकारामांचे अभंग, लीळाचरित्र यांसारखे संत साहित्य मानवालासदाचाराचा मार्ग दाखविते. संतांनी आपल्या कीर्तन-प्रवचनांमधून नैतिकतेची शिकवण सामान्य जनांना दिली.

विविध धर्म-पथांच्या साहित्यात जरी विविधता असली तरी या सर्वांचे लक्ष्य एकच होते, ते म्हणजे मानवतेचे हित आणि त्याकरिता त्यांनी सदैव सदिच्छा व सदाचरणाचा मार्ग समाजाला दाखविला.

महान संत एकनाथांची जन्मभूमी व कर्मभूमी असणाऱ्या श्रीक्षेत्र पैठण येथे संतपीठ उभे आहे. यामुळे सर्व संत व त्यांच्या विचारांची ओळख अखिल विश्वाला करुन देण्याची जबाबदारी संतपीठाला मिळालेली आहे.

'विष्णुमय जग' असा संतांचा ईश्वरविषयक व्यापक अनुभव असल्यामुळे सर्वेश्वराचीभक्ती ही केवळ देवालयातील भक्ती नसून 'सर्वाभूती भगवद्भाव' असे त्या भक्तीचे स्वरुप संतांनी समाजाला सांगितले.

'जन हेचि जनार्दन ।एका जनार्दनी भजन' अशी भक्तीची व्याख्या संतांनी समाजाला शिकविली. पारंपरिक धर्मरुढींवर आधारलेल्या जातिधर्मापेक्षा अध्यात्म, सर्वेश्वराची भक्ती श्रेष्ठ आहे, असे संतांनी विश्वाला पटवुन दिले, आणि 'भक्ती येथ सरे, जाति अप्रमाण' असा पुरोगामी उद्घोष संतांनी केला.

तथाकथित श्रेष्ठ वर्ण, भाषेची मक्तेदारी दूर करुन मराठमोळया समाजासाठी मराठी भाषेत साहित्य निर्माण केले आणि एकट्या-दुकट्याला वैकुंठात नेणाऱ्या वैयक्तिक साधनेऐवजी सामुहिक भजन-कीर्तन साधनेच्या माध्यमातून 'ते तिही वैकुंठचि केले आघवे' किंवा 'तुका म्हणे त्यांनी केली वैकुंठ मेदिनी' असा साक्षात्कार संतांनी करुन दाखविला. वैयक्तिकअनासक्त आत्मोद्धार साधना आणि भूतदयाशील लोकोद्धार साधना हेच संत परंपरेच्या आध्यात्मिक मानवतावादाचे रहस्य आहे.

आध्यात्मिक दिव्यता, मानवता आणि अंतर्बाहय समता असा त्रिवेणी संगम म्हणजे संतदर्शन. याप्रमाणे संतदर्शनाचा मागोवा घेऊन सदगुणसंवर्धन, भूतदया, त्याग, संयम, कर्तव्यनिष्ठा, अनासक्ती इत्यादी वैयक्तिक गुणविकास आणि मानवता, सामाजिक समता, सहिष्णुता, राष्ट्रीय एकात्मता, परोपकार, दीनोद्धार, मानवधर्मजागृती यांच्या आधारावर समाज विकास करणे ही संतपीठाची मुख्य भुमिका आहे.

## २. २०२६-२७ सत्राचे शैक्षणिक वेळापत्रक
## शैक्षणिक उपक्रम आणि सत्र

| अ.क्र. | कृती/कार्यक्रम | प्रारंभ | समाप्ती | एकूण दिवस |
|---|---|---|---|---|
| १ | शैक्षणिक सत्र (प्रथम सत्र) | १ सप्टेंबर २०२६ | ३१ डिसेंबर २०२६ | १२२ |
| २ | प्रवेश प्रक्रिया | १ सप्टेंबर २०२६ | १५ सप्टेंबर २०२६ | १५ |
| ३ | शैक्षणिक दिवस (प्रथम सत्र) | १६ सप्टेंबर २०२६ | ३१ डिसेंबर २०२६ | १०७ |
| ४ | प्रथम सत्र परीक्षा | १ जानेवारी २०२७ | १० जानेवारी २०२७ | १० |
| ५ | प्रथम सत्र अवकाश | ११ जानेवारी २०२७ | ३१ जानेवारी २०२७ | २० |
| ६ | शैक्षणिक सत्र (द्वितीय सत्र) | १ फेब्रुवारी २०२७ | ३१ मे २०२७ | १२० |
| ७ | शैक्षणिक दिवस (द्वितीय सत्र) | १ फेब्रुवारी २०२७ | ३१ मे २०२७ | १२० |
| ८ | द्वितीय सत्र परीक्षा | १ जून २०२७ | १० जून २०२७ | १० |
| ९ | द्वितीय सत्र अवकाश | ११ जून २०२७ | ३० जून २०२७ | २० |
| १० | पुढील शैक्षणिक सत्राचा प्रारंभ (२०२७-२८) | १ जुलै २०२७ | - | - |

## ३. शैक्षणिक अभ्यासक्रम

# १. अभ्यासक्रमाचे नाव : श्रीतुकारम गाथा ग्रंथ परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**कालावधी: एक (०१) वर्ष** — **एकूण गुण- ८००**

**किमान पात्रता: उच्चमाध्यमिक (१२वी)परीक्षा उत्तीर्ण** — **श्रेयांक- २४**

### अभ्यासक्रम योजना तपशील

**सत्र पहिले**

| अभ्यासक्रम क्रमांक | प्रारूप | व्याख्यान | स्वयं अध्ययन / क्षेत्र कार्य | श्रेयांक (क्रेडिट्स) | लेखी परीक्षा | अंतर्गत मुल्यांकन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| TG101 | संत तुकाराम चरित्र, व्यक्तित्त्व व कर्तृत्त्व | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| TG102 | भक्तियोग | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| TG103 | तत्त्वज्ञान व नाट प्रकरण | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| TG104 | प्रात्यक्षिक१ | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| | | १५० | ३० | १२ | ३०० | १०० | ४०० |

**सत्र दुसरे**

| अभ्यासक्रम क्रमांक | प्रारूप | व्याख्यान | स्वयं अध्ययन / क्षेत्र कार्य | श्रेयांक (क्रेडिट्स) | लेखी परीक्षा | अंतर्गत मुल्यांकन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| TG201 | तुकोबांचा लोकोपदेश | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| TG202 | पंचविध महिमा व कृष्णलीला | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| TG203 | भाषा वकाव्यसौंदर्य | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| TG204 | प्रात्यक्षिक २ | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| | | १५० | ३० | १२ | ३०० | १०० | ४०० |

## २. अभ्यासक्रमाचे नाव : श्री एकनाथी भागवत प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**कालावधी: एक (०१) वर्ष** **एकूण गुण- ८००**

**किमान पात्रता: उच्च माध्यमिक (१२वी) परीक्षा उत्तीर्ण** **श्रेयांक- २४**

### अभ्यासक्रम योजना तपशील

**सत्र पहिले**

| अभ्यासक्रम क्रमांक | प्रारूप | व्याख्यान | स्वयं अध्ययन / क्षेत्र कार्य | श्रेयांक (क्रेडिट्स) | लेखी परीक्षा | अंतर्गत मुल्यांकन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| EB101 | संत एकनाथ : चरित्र, व्यक्तित्व आणि कर्तृत्व | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| EB102 | श्रीएकनाथी भागवत ग्रंथ स्वरूप | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| EB103 | भिक्षु गीता | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| EB104 | प्रात्यक्षिक१ | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| | | १५० | ३० | १२ | ३०० | १०० | ४०० |

**सत्र दुसरे**

| अभ्यासक्रम क्रमांक | प्रारूप | व्याख्यान | स्वयं अध्ययन / क्षेत्र कार्य | श्रेयांक (क्रेडिट्स) | लेखी परीक्षा | अंतर्गत मुल्यांकन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| EB201 | कर्मयोग आणि ज्ञानयोग | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| EB202 | भक्तियोग | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| EB203 | काव्यास्वाद | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| EB204 | प्रात्यक्षिक२ | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| | | १५० | ३० | १२ | ३०० | १०० | ४०० |

## ३. अभ्यासक्रमाचे नाव : श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**कालावधी: एक (०१) वर्ष** | **एकूण गुण- ८००**

**किमान पात्रता: उच्चमाध्यमिक (१२वी)परीक्षा उत्तीर्ण** | **एकूण श्रेयांक (२४)**

**अभ्यासक्रम योजना तपशील**

### सत्र पहिले

| अभ्यासक्रम क्रमांक | प्रारूप | व्याख्यान | स्वयं अध्ययन / क्षेत्र कार्य | श्रेयांक (क्रेडिट्स) | लेखी परीक्षा | अंतर्गत मुल्यांकन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| DG101 | श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र, व्यक्तित्व व कर्तृत्व, | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| DG102 | कर्मयोग | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| DG103 | भक्तियोग | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| DG104 | प्रात्यक्षिक१ | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| | | १५० | ३० | १२ | ३०० | १०० | ४०० |

### सत्र दुसरे

| अभ्यासक्रम क्रमांक | प्रारूप | व्याख्यान | स्वयं अध्ययन / क्षेत्र कार्य | श्रेयांक (क्रेडिट्स) | लेखी परीक्षा | अंतर्गत मुल्यांकन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| DG201 | ज्ञानयोग | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| DG202 | काव्यसंपदा | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| DG203 | नैतिक मूल्ये | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| DG204 | प्रात्यक्षिक२ | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| | | १५० | ३० | १२ | ३०० | १०० | ४०० |

## ४. अभ्यासक्रमाचे नाव : वारकरी संप्रदाय परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**कालावधी: एक (०१) वर्ष** | **एकूण गुण- ८००**

**किमान पात्रता: उच्च माध्यमिक (१२वी) परीक्षा उत्तीर्ण** | **एकूण श्रेयांक (२४)**

### अभ्यासक्रम योजना तपशील

### सत्र पहिले

| अभ्यासक्रम क्रमांक | प्रारूप | व्याख्यान | स्वयं अध्ययन / क्षेत्र कार्य | श्रेयांक (क्रेडिट्स) | लेखी परीक्षा | अंतर्गत मुल्यांकन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| VS101 | वारकरी संप्रदाय: भूमिका,परिचयव संक्षिप्त इतिहास | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| VS102 | वारकरी संप्रदायाचा साधना मार्ग | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| VS103 | श्रीविठ्ठल, वारकरी व तीर्थक्षेत्र माहात्म्य | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| VS104 | प्रात्यक्षिक१ | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| | | १५० | ३० | १२ | ३०० | १०० | ४०० |

### सत्र दुसरे

| अभ्यासक्रम क्रमांक | प्रारूप | व्याख्यान | स्वयं अध्ययन / क्षेत्र कार्य | श्रेयांक (क्रेडिट्स) | लेखी परीक्षा | अंतर्गत मुल्यांकन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| VS201 | वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| VS202 | वारकरी संप्रदायास मान्य प्रमाणभूत ग्रंथ | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| VS203 | वारकरी संप्रदायाची नैतिक मूल्ये | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| VS204 | प्रात्यक्षिक२ | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| | | १५० | ३० | १२ | ३०० | १०० | ४०० |

# ५. अभ्यासक्रमाचेनाव : महानुभावसंप्रदायपरिचयअभ्यासक्रम

**कालावधी: एक (०१) वर्ष** **एकूणगुण- ८००**

**किमान पात्रता: उच्च माध्यमिक (१२वी) परीक्षाउत्तीर्ण** **एकूणश्रेयांक (२४)**

**अभ्यासक्रमयोजनातपशील**

**सत्रपहिले**

| अभ्यासक्रमक्रमांक | प्रारूप | व्याख्यान | स्वयं अध्ययन / क्षेत्रकार्य | श्रेयांक (क्रेडिट्स) | लेखीप रीक्षा | अंतर्गत मुल्यांकन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| MSP101 | महानुभाव संप्रदाय:भूमिका, परिचय व इतिहास | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| MSP102 | सर्वज्ञ चक्रधर स्वामी: चरित्र व कार्य | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| MSP103 | लीळाचरित्र | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| MSP104 | प्रात्यक्षिक - १. | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| | | १५० | ३० | १२ | ३०० | १०० | ४०० |

**सत्रदुसरे**

| अभ्यासक्रमक्रमांक | प्रारूप | व्याख्यान | स्वयं अध्ययन / क्षेत्रकार्य | श्रेयांक (क्रेडिट्स) | लेखीप रीक्षा | अंतर्गत मुल्यांकन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| MSP 205 | महानुभावांचे तत्त्वज्ञान व आचारधर्म | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| MSP 206 | महानुभावांचे गद्य वाङ्मय | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| MSP 207 | महानुभावांचे पद्य वाङ्मय | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| MSP208 | प्रात्यक्षिक२ | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| | | १५० | ३० | १२ | ३०० | १०० | ४०० |

## ६. अभ्यासक्रमाचे नाव : श्रीनामदेव गाथा प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**कालावधी: एक (०१) वर्ष** — **एकूण गुण- ८००**

**किमान पात्रता: उच्च माध्यमिक (१२वी) परीक्षा उत्तीर्ण** — **एकूण श्रेयांक (२४)**

### अभ्यासक्रम योजना तपशील

### सत्र पहिले

| अभ्यासक्रम क्रमांक | प्रारूप | व्याख्यान | स्वयं अध्ययन / क्षेत्र कार्य | श्रेयांक (क्रेडिट्स) | लेखी परीक्षा | अंतर्गत मुल्यांकन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| NG101 | श्री नामदेव महाराज चरित्र, व्यक्तित्त्व व कर्तृत्व | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| NG102 | भक्तियोग | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| NG103 | पंचविध महिमा | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| NG104 | प्रात्यक्षिक१ | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| | | १५० | ३० | १२ | ३०० | १०० | ४०० |

### सत्र दुसरे

| अभ्यासक्रम क्रमांक | प्रारूप | व्याख्यान | स्वयं अध्ययन / क्षेत्र कार्य | श्रेयांक (क्रेडिट्स) | लेखी परीक्षा | अंतर्गत मुल्यांकन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| NG201 | उपदेश व तत्त्वचिंतन | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| NG202 | कृष्णलीला व आख्यान काव्य | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| NG203 | संतचरित्रे, भाषा व काव्यसौंदर्य | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| NG204 | प्रात्यक्षिक२ | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| | | १५० | ३० | १२ | ३०० | १०० | ४०० |

## ७. अभ्यासक्रमाचेनाव : संत तत्त्वज्ञान परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**कालावधी: एक (०१) वर्ष** — **एकूण गुण- ८००**

**किमान पात्रता: उच्च माध्यमिक (१२वी) परीक्षाउत्तीर्ण** — **एकूण श्रेयांक (२४)**

### अभ्यासक्रम योजना तपशील

**सत्र पहिले**

| अभ्यासक्रमक्रमांक | प्रारूप | व्याख्यान | स्वयं अध्ययन / क्षेत्र कार्य | श्रेयांक (क्रेडिट्स) | लेखीपरीक्षा | अंतर्गत मुल्यांकन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| STP101 | भारतीय ज्ञान परंपरा व दर्शनशास्त्र | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| STP102 | आद्य शंकराचार्य तत्त्वज्ञान/ अद्वैत तत्त्वज्ञान | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| STP103 | ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| STP104 | प्रात्यक्षिक१ | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| | | १५० | ३० | १२ | ३०० | १०० | ४०० |

**सत्रदुसरे**

| अभ्यासक्रमक्रमांक | प्रारूप | व्याख्यान | स्वयं अध्ययन / क्षेत्र कार्य | श्रेयांक (क्रेडिट्स) | लेखी परीक्षा | अंतर्गत मुल्यांकन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| STP 201 | नामदेव महाराजांचे तत्त्वज्ञान | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| STP 202 | एकनाथी भागवतातील तत्त्वज्ञान | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| STP 203 | तुकाराम महाराजांचे तत्त्वज्ञान | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| STP 204 | प्रात्यक्षिक२ | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| | | १५० | ३० | १२ | ३०० | १०० | ४०० |

## ८. अभ्यासक्रमाचेनाव : सांप्रदायिक संगीत परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**कालावधी: एक (०१) वर्ष** — **एकूण गुण- ८००**

**किमान पात्रता: उच्च माध्यमिक (१२वी) परीक्षाउत्तीर्ण** — **एकूण श्रेयांक (२४)**

### अभ्यासक्रम योजना तपशील

### सत्र पहिले

| अभ्यासक्रम क्रमांक | प्रारूप | व्याख्यान | स्वयं अध्ययन / क्षेत्र कार्य | श्रेयांक (क्रेडिट्स) | लेखी परीक्षा | अंतर्गत मुल्यांकन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| MT101 | मृदंग तबला परिचय व इतिहास | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| MT102 | ताल शास्त्र व लय परिचय | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| MT103 | संगीताचे मुलभूत ज्ञान | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| MT104 | प्रात्यक्षिक१ | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| | | १४० | ४ ० | १२ | २८० | १२० | ४०० |

### सत्र दुसरे

| अभ्यासक्रम क्रमांक | प्रारूप | व्याख्यान | स्वयं अध्ययन / क्षेत्र कार्य | श्रेयांक (क्रेडिट्स) | लेखी परीक्षा | अंतर्गत मुल्यांकन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| MT201 | प्रगत ताल व वादन शैली | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| MT202 | भजन, कीर्तन व साथ संगत | ४० | ०५ | ३ | ८० | २० | १०० |
| MT203 | भारतीय संगीत परंपरा | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| MT204 | प्रात्यक्षिक२ | ३० | १५ | ३ | ६० | ४० | १०० |
| | | १४० | ४० | १२ | २८० | १२० | ४०० |

## ४. संतपीठाचे प्रवेश धोरण व प्रक्रिया

- प्रमाणपत्र अभ्यासक्रम हा नियमित उपस्थिती पद्धतीने राबविण्यात येईल.
- प्रमाणपत्र अभ्यासक्रमास नियमित पध्दतीने प्रवेशित विद्यार्थी क्षमता ही २० आहे.
- सर्व प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची किमान शैक्षणिक पात्रता ही उच्च माध्यमिक परीक्षा (१२ वी) उत्तीर्ण असावे.
- एका शैक्षणिक वर्षात एका वेळेस एकाच प्रमाणपत्र अभ्यासक्रमास प्रवेश मिळेल. त्यामुळे विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना अर्ज करताना पसंती क्रम देणे आवश्यक राहील.
- प्रवेश अर्ज हा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल. अंतिम तारखेनंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही.
- या प्रवेश प्रक्रियेतील सर्व नियमावलीतील बदल करण्याचे सर्वाधिकार हे मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, यांचे असतील, असे सर्व बदल हे विद्यापीठाच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येईल.

## ५. विहित शुल्क संरचना

**प्रवेश शुल्क - २०००/-**
**परीक्षा शुल्क -**
**प्रथम सत्र शुल्क - २५०/-**
**द्वितीय सत्र शुल्क - २५०/-**

## ६. सामान्य नियम आणि शिस्त

- नियमित अशा दोन्ही प्रकारच्या प्रवेश पद्धतीत वर्ग उपस्थिती ही किमान ७५ टक्के असणे बंधनकारक असेल.
- एक वर्षाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम हे निवासी पद्धतीचे नसून या प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी कुठलीही कायम निवास व्यवस्था सध्या उपलब्ध नाही.
- अंतिम तारखेनंतर प्राप्त प्रवेश अर्जांचा विचार केला जाणार नाही.
- संतपीठाच्या आवारात धुम्रपान करण्यास सक्त मनाई आहे.
- सर्व धर्म, पंथ- सांप्रदायिक संतांचा आणि ग्रंथांचा आदर करावा.
- संतांचे विचार उद्धृत करताना चुकीचे किंवा अप्रमाणित वचन संतांच्या नावावर देऊ नये.
- जात, पंथ, धर्म, प्रदेश किंवा व्यक्तीविषयक पूर्वग्रह न ठेवता संतांच्या विचारांचा मानवतावादी आणि समतावादी दृष्टिकोनातून अभ्यास करावा.
- संत वाङ्मयातील सत्य, समता,दया, क्षमा, परोपकार, नम्रता आणि बंधुभाव ही मूल्ये आपल्या आचरणात आणण्याचा प्रयत्न करावा.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर संचलित

# संतपीठ, श्रीक्षेत्र पैठण

"NAAC Reaccredited with 'A+' Grade"

## प्रवेश अर्ज (२०२६)

फोटो येथे चिटकवा

प्रति,

समन्वयक,

संतपीठ, श्रीक्षेत्र पैठण,

मी ................................................... साठी नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेशासाठी अर्ज करत आहे. शैक्षणिक वर्ष **२०२६** साठी मी माझे तपशील खाली देत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **Surname**/ आडनाव | | **Religion**/धर्म | |
| **Name**/ पहिले नाव | | Handicapped/दिव्यांग | |
| **Middle Name**/नाव | | **PRN No.** /पीआरन न | |
| **Students Contact No.** संपर्क क्र | | **Domicile**/अधिवास | |
| **Students Email ID**/ईमेल आयडी | | **Nationality** /राष्ट्रियत्व | |
| **DOB**/जन्मतारीख | | **Category** | |
| **Place of Birth**/ जन्मस्थान | | **Caste**/जात | |
| **Gender**/लिंग | | **Married** /विवाहित | |
| **Aadhar No.**/आधार न. | | **Permanent/ Address** कायम पत्ता **Pin Code**/ **पिन कोड** | |
| **ABC ID No.** | | | |
| **Father Full Name**/ पालकाचे नाव | | | |
| **Mother Name**/आईचे नाव | | | |

शैक्षणिक अहर्ता

| उत्तीर्ण परीक्षेचे नाव | महाविद्यालय/विद्यापीठाचे नाव | किती पैकी | मिळालेले गुण | टक्केवारी | निकाल |
|---|---|---|---|---|---|
| HSC/एच.एस.सी | | | | | |

प्रवेश घ्यावयाच्या अभ्यासक्रमसमोर ✔ करावे

१. श्रीतुकाराम गाथा ग्रंथ परिचय - (__________)

२.श्रीएकनाथी भागवत ग्रंथ परिचय - (__________)

३.श्रीज्ञानेश्वरी ग्रंथ परिचय - (__________)

४.वारकरी संप्रदाय परिचय - (__________)

५.महानुभाव संप्रदाय परिचय - (__________)

६.श्री नामदेव गाथा ग्रंथ परिचय (__________)

७.संताचे तत्त्वज्ञान (__________)

८.सांप्रदायीक संगीत परिचय (__________)

हमीपत्र

मी प्रमाणित करतो की, उपरोक्त अर्जात नमूद केलीली सर्व माहिती माझ्या माहितीनुसार सत्य व वास्तव आहे. जर मला या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला तर. सर्व आवश्यक कागदपत्रे मूळ स्वरूपात, प्रशस्तिपत्रांसह ताबडतोब सादर करण्याची जबाबदारी मी स्वीकारतो. मी खात्री देतो की मी विद्यापीठाच्या शिस्तीचे नियम काटेकोरपणे पाळीन. मला माहिती आहे की, माझ्या अर्जामध्ये कोणतीही खोटी माहिती आढळल्यास किंवा माझ्याकडून अनुशासनहीन वर्तन आढळल्यास, योग्य ती कारवाई करण्यास विद्यापीठ स्वतंत्र आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे.

आपला विश्वासू,

ठिकाण - . ***छत्रपती संभाजीनगर***

तारीख –

https://bamua.digitaluniversity.ac/

**ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी क्लिक करणे**

स्वाक्षरी ----------------------------------

नाव ----------------------------------------------